पोलीस अधीक्षक, कार्यालय, पालघर.
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp. palghar@mahapolice.gmail.com

---

# प्रेसनोट क्र. ४३ दिनांक २२/०८/२०२२

# अवैधरित्या दारुची वाहतूक करणाऱ्या आरोपीतांवर मनोर पोलीस ठाणे यांचेकडून कारवाई

दिनांक.२१/०८/२०२२ रोजी पोलीस निरीक्षक श्री. प्रदिप कसबे, प्रभारी अधिकारी मनोर पोलीस ठाणे यांना गोपनीय बातमीदारकडुन मौजे शिळशेत गावचे हददीत नाळशेत गावाकडे जाणारे रोडलगत ता. विक्रमगड जि. पालघर येथे विदेशी दारुची अवैध वाहतूकीकरीता एका आयसर टेम्पोतील दारुचा साठा आडोशाला इतर तीन वाहनांमध्ये भरत असल्याची गुप्त माहिती मिळाली होती.

सदरची माहिती प्राप्त होताच पोलीस निरीक्षक श्री. प्रदिप कसबे, प्रभारी अधिकारी मनोर पोलीस ठाणे व सपोनि/पडळकर यांनी पोलीस पथकासह वरील नमुद ठिकाणी छापा टाकला असता आयसर टेम्पो नं. एम.एच. ०४ के. यु. ३७२४ या गाडीतून काही इसम दोन बोलेरो गाडी व एका कारमध्ये अवैध दारु भरत असल्याची खात्री झाल्याने त्याठिकानी पोहोचले असता सदर इसमांना पोलीसांची चाहुल लागली असल्याने त्या ठिकानाहून वाहने जागीच सोडून आरोपींनी पळ काढला, म्हणून पोलीसांनी सदर आरोपींचा पाठलाग केला. परंतू अंधाराचा व आडोश्याचा फायदा घेवून त्या ठिकाणाहून आरोपी पळून गेले. सदर चारही वाहनांजवळ येवून खात्री केली असता खालील वर्णनाची अवैध दारु व मुद्देमाल मिळून आला.

१)१५,००,०००/- रुपये किं.एक आयसर टेम्पो नं. MH04/KU/3724 जु.वा.किं.सु.

२)९,५७,६००/-रुपये किंमतीचे एकुण २१० पुठयाचे बॉक्स, एका पुठयाच्या बॉक्समध्ये ४८ प्लॅस्टीकच्या सिलबंद बॉटल, प्रत्येक बॉटलचे झाकणावर RB व बॉटलचे कागदी लेबलवर ROYAL BLUE Mall WHISKY, BLENDED & BOTTLED BY UNIVERSAL DISTILLERY PVT.LTD.SHED NO.155 INDUSTRIAL ESTATE PRODUCE OF INDIA, 180 ML असे लिहीलेले प्रति बॉटल अंदाजे ९५/-रुपये प्रमाणे. (आयसर टेम्पो नं.MH04/KU/3724 यामध्ये मिळुन आलेला)

३) ९,५०,०००/-रुपये किं.एक बोलेरो कंपनीची पिकअप गाडी नं.MH48/CB/3840 तिचा इंजिन नं. TNM1M96415 असा असुन, चेसिस नं.MA1ZU2TNKN1A11985 अशी (विना चावीचा) जु.वा.किं.सु.

४)१२,९९,६००/-रुपये किंमतीचे एकुण २८५ पुठयाचे बॉक्स, एका पुठयाच्या बॉक्समध्ये ४८ प्लॅस्टीकच्या सिलबंद बॉटल, प्रत्येक बॉटलचे झाकणावर RB व बॉटलचे कागदी लेबलवर ROYAL BLUE Mall

WHISKY, BLENDED & BOTTLED BY UNIVERSAL DISTILLERY PVT.LTD.SHED NO.155 INDUSTRIAL ESTATE PRODUCE OF INDIA, 180 ML असे लिहीलेले प्रति बॉटल अंदाजे ९५/-रुपये प्रमाणे. (बोलेरो कंपनीची पिकअप नं.MH48/CB/3840 यामध्ये मिळुन आलेला)

५) ६,५०,०००/-रुपये किं.एक बोलेरो कंपनीची पिकअप गाडी नं.MH48/BM/6447 तिचा इंजिन नं. TBL4A80976 असा असुन, चेसिस नं.MA1ZP2TBKL6A31926 अशी (विना चावीचा) जु.वा.किं.सु.

६) १०,९४,४००/-रुपये किंमतीचे एकुण २४० पुठयाचे बॉक्स, एका पुठयाच्या बॉक्समध्ये ४८ प्लॅस्टीकच्या सिलबंद बॉटल, प्रत्येक बॉटलचे झाकणावर RB व बॉटलचे कागदी लेबलवर ROYAL BLUE Mall WHISKY, BLENDED & BOTTLED BY UNIVERSAL DISTILLERY PVT.LTD.SHED NO.155 INDUSTRIAL ESTATE PRODUCE OF INDIA, 180 ML असे लिहीलेले प्रति बॉटल अंदाजे ९५/- रुपये प्रमाणे. (बोलेरो कंपनीची पिकअप गाडी नं.MH48/BM/6447 यामध्ये मिळुन आलेला)

७) ७,००,०००/- रुपये किं.एक फोर्ड कंपनीची इको स्पोर्टस कार नं.MH48/S/4300 तिचा इंजिन नं.EY25008 असा असुन, चेसिस नं.MAJAXXMRKAEY25008 अशी (विना चावीचा) जु.वा.किं.सु.

८)१,१४,०००/-रुपये किंमतीचे एकुण २५ पुठयाचे बॉक्स, एका पुठयाच्या बॉक्समध्ये ४८ प्लॅस्टीकच्या सिलबंद बॉटल, प्रत्येक बॉटलचे झाकणावर RB व बॉटलचे कागदी लेबलवर ROYAL BLUE Mall WHISKY, BLENDED & BOTTLED BY UNIVERSAL DISTILLERY PVT.LTD.SHED NO.155 INDUSTRIAL ESTATE PRODUCE OF INDIA, 180 ML असे लिहीलेले प्रति बॉटल अंदाजे ९५/- रुपये प्रमाणे. (फोर्ड कंपनीची इको स्पोर्टस कार नं.MH48/S/4300 यामध्ये मिळुन आलेला.

असा एकूण ७२,६५,६००/-रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सदर बाबत मनोर पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. ाा २१५/२०२२ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(a) व (e) सह मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम ६६(१)/१९२ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्ह्यात वापरण्यात आलेले चारही वाहनांवरुन आरोपींचा तसेच आरोपीत यांनी सदर माल कोठून आणला व कोठे घेऊन जाणार होते याबाबतचा अधिक तपास सपोनि/पडळकर, नेम.मनोर पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक पालघर यांचे मार्गदर्शनाखाली श्रीमती निता पाडवी, उपविभागीय पोलीस अधिकारी पालघर, श्री. प्रदिप कसबे, प्रभारी अधिकारी मनोर पोलीस ठाणे, सपोनि/पडळकर नेमणूक मनोर पोलीस ठाणे व मनोर पोलीस ठाणेचे पोलीस अंमलदार यांनी यशस्विरित्या पार पाडली आहे.